23 OCT 2022

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'ए.डी.सायंटिफिक'मध्ये विद्यापीठाची भरारी

## विद्यापीठातील ८० संशोधकांचा समावेश : देशातील १ हजार विद्यापीठांमध्ये २५ वे स्थान

प्रतिनिधी

कोल्हापूर

'ए. डी. सायंटिफिक इंडेक्स'तर्फे नुकत्याच जाहीर झालेल्या 'वर्ल्ड सायंटिस्ट अँड युनिव्हर्सिटी रँकिंग'मध्ये शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के व प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्यासह ८० संशोधक-प्राध्यापकांचा समावेश झाला आहे. देशातील १ हजार १०३ शैक्षणिक संस्थांच्या यादीत शिवाजी विद्यापीठाला २५ वे स्थान मिळाले आहे. विद्यापीठाने सायंटिफिक इंडेक्सच्या यादीत भरारी घेतली आहे.

एडी सायंटिफिक इंडेक्स (अल्पर-डोजर सायंटिफिक इंडेक्स) विद्यापीठांचे मूल्यमापन करणाऱ्या इतर प्रणालींपेक्षा वेगळी आहे. यात शास्त्रज्ञांच्या संशोधनातील कामगिरी आणि वैयक्तिक वैज्ञानिक उत्पादकतेच्या अतिरिक्त मूल्यावर आधारित क्रमवारी, विश्लेषण




केले आहे. शास्त्रज्ञांच्या वैज्ञानिक वैशिष्ट्यांवर आधारित संस्थांची क्रमवारी काढली जाते. शिवाजी विद्यापीठ मटेरियल सायन्स संशोधनात सर्वोत्तम संस्थांपैकी एक आहे. कुलगुरू डॉ. शिर्के यांनी संख्याशास्त्रात तर प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांना भौतिकशास्त्रात संशोधन केले आहे. यादीत आजी-माजी संशोधकांसह देश-विदेशात कार्यरत संशोधक विद्यार्थी-शिक्षकांसह निवृत्त प्राध्यापकांचा समावेश आहे.

### यादीत स्थान मिळालेले संशोधक

डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. पी. एस.



कुलगुरु डॉ. शिर्के



डॉ. पी. एस. पाटील

पाटील, एस. पी. गोविंदवार, केशव राजपुरे, सी. एच. भोसले, आण्णासाहेब मोहोळकर, ज्योती जाधव, के. एम. गरडकर, संजय कोळेकर, अनिल घुले, एस. डी. डेलेकर, राजेंद्र सोनकवडे, एन. आय. तरवाळ, जी. बी. कोळेकर, विजया पुरी, एस. आर. सावंत, तुकाराम डोंगळे, प्रमोद वासंबेकर, राजश्री साळुंखे, एम. बी. देशमुख, के. डी. सोनवणे, टी. जे. शिंदे, जॉन डिसुझा, गजानन राशिनकर, दिलीप दगडे, एस. बी. सादळे, मानसिंग टाकळे, पी. डी. राऊत, अशोक गडकरी, ए. के. साहू, संतोष पायघन, निखील गायकवाड, किशोर कुचे, एम. व्ही. सांताकुमार, आर. आर. मुधोळकर, पी. बी. दंडगे, राहुल रणवीर, दत्तात्रय गायकवाड, किरणकुमार शर्मा, नीरज राणे, पंकज पवार, नीलम डिगे, टी. व्ही. साठे, एन. आर. प्रसाद, अनंत दोड्डमणी, उत्कर्ष मोरे, एन. एस. चव्हाण, एस. जी. घाणे, सतीश पाटील, सोनल चोंदे, विजय कोरे, एस. एस. कांबळे, निरंजना चव्हाण, सुहास कदम, क्रांतीवीर मोरे, आर. व्ही. गुरव, एस. आर. यंकंची, आसिफ तांबोळी, व्ही. ए. सावंत, चेतन आवारे, शशीभूषण महाडिक, सचिन पन्हाळकर, एम. एम. डोंगरे, संभाजी शिंदे, कबीर खराडे, प्रयागराज फांदीलोलू, एम. पी. भिलावे, हेमांगी कुलकर्णी, नितीन कांबळे, सुरेश सूर्यवंशी, जयवंत पाताडे, मिलींद सुतार, मेधा नानिवडेकर, इराण्णा उडचण, कविता ओझा, एस. एम. गायकवाड, पी. एस. कांबळे, विनायक गावडे.

23 OCT 2022

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'ए.डी. सायंटिफिक इंडेक्स'मध्ये ८० संशोधक

## शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू, प्र-कुलगुरूंचाही समावेश; विद्यापीठास देशात २५ वे स्थान

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

'ए.डी. सायंटिफिक इंडेक्स'तर्फे नुकत्याच जाहीर करण्यात आलेल्या 'वर्ल्ड सायंटिस्ट अँड युनिव्हर्सिटी रँकिंग-२०२३'मध्ये शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के व प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्यासह एकूण ८० संशोधक-प्राध्यापकांचा समावेश झालेला आहे.

विद्यापीठास देशातील १ हजार १०३ शैक्षणिक संस्थांच्या यादीत देशात २५ वे स्थान प्राप्त झाले आहे. या यादीमध्ये प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांचा एच-इंडेक्स हा सर्वाधिक म्हणजे ७९ इतका आहे, तसेच त्यांच्या संशोधनास ४६ हजार ४०८ इतकी प्रचंड सायटेशन्सही प्राप्त झाली आहेत.



डॉ. दिगंबर शिर्के डॉ. प्रमोद पाटील

क्रमवारीमध्ये डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. पी. एस. पाटील, एस. पी. गोविंदवार, केशव राजपुरे, सी. एच. भोसले, आण्णासाहेब मोहोळकर, ज्योती जाधव, के. एम. गरडकर, संजय कोळेकर, अनिल घुले, एस. डी. डेलेकर, राजेंद्र सोनकवडे, एन. आय. तरवाळ, जी. बी. कोळेकर, विजया पुरी, एस. आर. सावंत, तुकाराम डोंगळे, प्रमोद वासंबेकर, राजेश्री साळुंखे, एम. बी. देशमुख, के. डी. सोनवणे, टी. जे. शिंदे, जॉन डिसूझा, गजानन राशिनकर, दिलीप दगडे, एस. बी. सादळे, मानसिंग टाकळे, पी. डी. राऊत, अशोक गडकरी, ए. के. साहू, संतोष पायघन, निखिल गायकवाड, किशोर कुचे, एम. व्ही. सांताकुमार, आर. आर. मुधोळकर, पी. बी. दंडगे, राहुल रणवीर, दत्तात्रय गायकवाड, किरणकुमार शर्मा, नीरज राणे, पंकज पवार, नीलम डिगे, टी. व्ही. साठे, एन. आर. प्रसाद, अनंत दोड्डमणी, उत्कर्ष मोरे, एन. एस. चव्हाण, एस. जी. घाणे, सतीश पाटील, सोनल चोंदे, विजय कोरे, एस. एस. कांबळे, निरंजना चव्हाण, सुहास कदम, क्रांतिवीर मोरे, आर. व्ही. गुरव, एस. आर. यंकंची, आसिफ तांबोळी, व्ही. ए. सावंत, चेतन आवारे, शशिभूषण महाडिक, सचिन पन्हाळकर, एम. एम. डोंगरे, संभाजी शिंदे, कबीर खराडे, प्रयागराज फांदीलोलू, एम. पी. भिलावे, हेमांगी कुलकर्णी, नितीन कांबळे, सुरेश सूर्यवंशी, जयवंत पाताडे, मिलिंद सुतार, मेधा नानिवडेकर, इराण्णा उडचण, कविता ओझा, एस. एम. गायकवाड, पी. एस. कांबळे, विनायक विठ्ठल गावडे यांचा समावेश आहे.

> कुलगुरू डॉ. शिर्के यांनी संख्याशास्त्र विषयात संशोधन केले आहे. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांना भौतिकशास्त्रातील संशोधनासाठी क्रमवारीत आघाडीचे स्थान प्राप्त झाले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

23 OCT 2022 लोकसत्ता

# युवा महोत्सवात साताऱ्याची बाजी

लोकसत्ता वार्ताहर

**कराड :** शिवाजी विद्यापीठ व कराडच्या सद्गुरू गाडगे महाराज महाविद्यालयाने आयोजिलेल्या ४२ व्या जिल्हास्तरीय युवा महोत्सवात साताराच्या चार महाविद्यालयांनी सहा सांघिक स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला. तर, कराडच्या दोन महाविद्यालयांनी तीन स्पर्धांमध्ये अव्वलस्थान पटकावले.

सद्गुरू गाडगे महाराज महाविद्यालयातील युवा महोत्सवात जिल्ह्यातील ४६ महाविद्यालयांमधून एक हजारांहून अधिक स्पर्धक सहभागी झाले होते. या स्पर्धेतील विजेते आटपाडीत होणाऱ्या मध्यवर्ती युवा महोत्सवात सहभागी होणार आहेत.

स्पर्धेतील निकाल असा- लोककला- सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालय सातारा, सद्गुरू गाडगे महाराज महाविद्यालय कराड, दहिवडी महाविद्यालय. लोकनृत्य - यशवंतराव चव्हाण शास्त्र महाविद्यालय सातारा, मुधोजी महाविद्यालय फलटण, छत्रपती शिवाजी महाविद्यालय सातारा. मूकनाट्य- दहिवडी महाविद्यालय, सावित्रीबाई फुले महाविद्यालय सातारा, मुधोजी महाविद्यालय फलटण. नकला - यशवंतराव चव्हाण शास्त्र महाविद्यालय सातारा, सद्गुरू गाडगे महाराज महाविद्यालय कराड, मुधोजी महाविद्यालय फलटण.

वादविवाद - डी. पी. भोसले महाविद्यालय कोरेगाव, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय कराड, सुगमगायन - शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय कराड, सद्गुरू गाडगे महाराज महाविद्यालय कराड, मुधोजी महाविद्यालय फलटण. लोकसंगीत वाद्यवृंद - मुधोजी महाविद्यालय फलटण, यशवंतराव चव्हाण शास्त्र महाविद्यालय सातारा, डी. पी. भोसले महाविद्यालय कोरेगाव. लघुनाटिका - धनंजयराव गाडगीळ महाविद्यालय सातारा, मुधोजी महाविद्यालय फलटण, शशिकांत शिंदे महाविद्यालय मेढा, एकांकिका - शंकरराव जगताप महाविद्यालय वाघोली, शिवाजी महाविद्यालय सातारा, कला-वाणिज्य महाविद्यालय नागठाणे. समूहगीत - मुधोजी महाविद्यालय फलटण, शिवाजी महाविद्यालय सातारा, सद्गुरू गाडगे महाराज महाविद्यालय कराड. पथनाट्य - यशवंतराव चव्हाण शास्त्र महाविद्यालय कराड, किसनवीर महाविद्यालय वाई, गाडगे महाराज महाविद्यालय कराड. प्रश्नमंजूषा - यशवंतराव चव्हाण शास्त्र महाविद्यालय सातारा, डी. पी. भोसले महाविद्यालय कोरेगाव. मराठी वक्तृत्व - कला-वाणिज्य महाविद्यालय नागठाणे, सद्गुरू गाडगे महाराज महाविद्यालय कराड, छत्रपती शिवाजी महाविद्यालय सातारा. हिंदी वक्तृत्व - डी. पी. भोसले महाविद्यालय कोरेगाव, सावित्रीबाई फुले महाविद्यालय सातारा, मुधोजी महाविद्यालय फलटण. इंग्रजी वक्तृत्व - शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय कराड, सद्गुरू गाडगे महाराज महाविद्यालय कराड, छत्रपती शिवाजी महाविद्यालय सातारा.

तरूण भारत

# करदात्यांच्या रकमेचा विनियोग योग्य पद्धतीने व्हावा

कोल्हापूर : करदात्यांची रक्कम पारदर्शक ठेवून निधी देणाऱ्या संस्थेला योग्य चित्र दिसले पाहिजे, असे काम करावे, असे प्रतिपादन केरळ विद्यापीठाचे प्र कुलगुरू टी. पी. अजयकुमार, यांनी केरळ विद्यापीठातील स्तुति प्रशिक्षण समारोप प्रसंगी केले. केंद्रीय विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालय प्रायोजित, स्तुति योजनेंतर्गत केरळ विद्यापीठाच्या उपकरणे आणि सुविधेसाठी केंद्रीय प्रयोगशाळा व शिवाजी विद्यापीठांच्या संयुक्त विद्यमाने केरळ येथे ७ दिवसीय कार्यशाळेचे आयोजन केले होते. केरळ येथे या समारोप कार्यक्रमात केरळ विद्यापीठाचे प्र कुलगुरू टी. पी. अजयकुमार, सिंडिकेट सदस्य के. जी. गोपचंद्रन, स्तुती समन्वयक प्रा. आर. जी. सोनकवडे उपस्थित होते. प्रा. जी. एम. नायर यांनी समारोपात आढावा घेतला. संचालक डॉ. जी. सुबोध यांनी सर्व सहभागींचे कौतुक केले.

23 OCT 2022
तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# इस्लामपूरच्या कन्या महाविद्यालयाकडे कबड्डी स्पर्धेचे जेतेपद

## कोल्हापूरचे छत्रपती शहाजी कॉलेज उपविजेता : आष्टा येथील डांगे महाविद्यालय तिसऱ्या स्थानी

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय महिला कबड्डी स्पर्धेत चुरशी खेळल्या गेलेल्या अंतिम सामन्यात इस्लामपूरच्या के. आर. पी. कन्या महाविद्यालयाने कोल्हापूरच्या छत्रपती शहाजी कॉलेजचा पराभव करून जेतेपद पटकावले. तिसऱ्या क्रमांकासाठी झालेल्या सामन्यात हातकणंगले येथील अण्णासाहेब डांगे महाविद्यलयने आष्टा (जि. सांगली) येथील आर्टस्‌ ॲण्ड कॉमर्स कॉलेजला पराभूत करत स्पर्धेतील आपला दबदबा कायम ठेवला.

या स्पर्धेत कोल्हापूर, सांगली व सातारा येथील १२ महाविद्यालयीन संघांनी सहभाग घेतला होता. स्पर्धेचा अंतिम तर के. आर. पी. कन्या महाविद्यालय व शहाजी महाविद्यालय या संघांनी अतिशय अटीतटीने खेळला. सामन्याच्या प्रारंभी शहाजी महाविद्यालयाने




कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय महिला कबड्डी स्पर्धेचे अजिंक्यपद मिळवलेल्या कन्या महाविद्यालयाला चषक देऊन गौरवताना मान्यवर

कन्या महाविद्यालयावर वर्चस्व मिळवत दहा गुणांची आघाडी घेतली. उत्तरार्धात सरोजिनी पाटील, श्रद्धा माळी व पूजा शिंदे यांनी आक्रमक चाली करत कन्या महाविद्यालयासाठी आगाऊ गुणांची कमाई केली. सामना संपण्यास काहीच मिनिटे बाकी असतानाच सरोजिनी, श्रद्धा व पूजा यांनी कन्या महाविद्यालयासाठी महत्वपुर्ण असे पाच गुण मिळवले. शहाजी महाविद्यालयाच्या अंकिता चेचर, ऋतुजा लांडगे निर्जला बोधे यांनी ही पराभव टाळण्यासाठी टोकाचे प्रयत्न केले. पण त्यात त्यांना यश आले नाही. अखेर या सामन्यात कन्या महाविद्यालयाने जेतेपदावर शिक्कामोर्तब केले.

जनसंपर्क कक्ष
२३ OCT 2022 लोकमत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दीड वर्षांत ९९ महाविद्यालयांना मिळाले कायमस्वरूपी प्राचार्य

## शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रात ३४ ठिकाणी प्रभारींवर जबाबदारी

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील १३३ पैकी ९९ अशासकीय अनुदानित महाविद्यालयांना गेल्या दीड वर्षांत पूर्णवेळ प्राचार्य मिळाले आहेत. अद्याप ३४ महाविद्यालयांतील रिक्त पदे असून त्याठिकाणी प्रभारींवर काम सुरू आहे.

शासनाच्या निर्देशानुसार या पदांच्या भरतीची प्रक्रिया चालू आहे. महाविद्यालयाचे प्रशासन आणि शैक्षणिक कामकाज सांभाळण्याची जबाबदारी असणारे प्राचार्य हे विद्यापीठ कार्यक्षेत्रातील बहुतांश महाविद्यालयात प्रभारी स्वरूपात कार्यरत होते. त्यामुळे धोरणात्मक निर्णय घेताना आणि त्यांची अंमलबजावणी करताना विविध अडचणींना महाविद्यालय प्रशासनाला तोंड द्यावे लागत होते. त्यावर प्राचार्य, संस्थाचालक संघटनांनी शासनाकडे या पदभरतीला मान्यता देण्यासाठी पाठपुरावा केला. त्यावर शासनाने गेल्या दीड वर्षांपूर्वी पदभरतीला मान्यता दिली. त्यानुसार शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील महाविद्यालयांकडून भरतीची कार्यवाही सुरू झाली. त्यातून आतापर्यंत ९९ महाविद्यालयांना पूर्णवेळ प्राचार्य मिळाले आहेत. उर्वरित ३४ महाविद्यालयांमध्ये भरतीची प्रक्रिया सुरू आहे.

> शासनाच्या निर्देशानुसार विद्यापीठ कार्यक्षेत्रातील महाविद्यालयांमध्ये प्राचार्य पदभरतीची कार्यवाही सुरू आहे. याबाबत महाविद्यालयांकडून प्राप्त होणारे प्रस्ताव मान्यतेसाठी वरिष्ठ कार्यालयाला पाठविण्यात येतात.
>
> -डॉ. हेमंत कठरे, सहसंचालक, उच्च शिक्षण विभाग कोल्हापूर

> प्राचार्य हे महाविद्यालयातील महत्त्वाचे पद आहे. ते रिक्त राहिल्यास महाविद्यालयाचे कामकाज डळमळीत होते. या पदावर प्रभारी म्हणून काम करताना विविध मर्यादा येतात. महाविद्यालयाची गुणवत्तावाढीसाठी पूर्णवेळ प्राचार्य असणे आवश्यक ठरते. त्यामुळे विद्यापीठ कार्यक्षेत्रातील उर्वरित सर्व महाविद्यालयांत पूर्णवेळ प्राचार्यांची नियुक्ती व्हावी.
>
> -डॉ. व्ही. एम. पाटील, सचिव, शिवाजी विद्यापीठ प्राचार्य असोसिएशन

### प्राचार्यांचे प्रलंबित प्रश्न सुटावेत

प्राचार्यांची वेतनश्रेणीची निश्चिती, सहाव्या वेतन आयोगानुसार ४३ हजार वेतनश्रेणी दि. १ जानेवारी २००६ पासून लागू करणे, पाच वर्षांच्या कालावधीची मर्यादा काढणे, वयोमर्यादा सरसकट ६५ करणे, आदी प्रश्न प्रलंबित आहेत. ते शासनाने लवकर सोडवावेत, अशी मागणी डॉ. पाटील यांनी केली.

